# <u>प्रेसनोट</u>

दि. ०४/०३/२०२४

## महावितरण कार्यालय, उपविभाग ऊरुळीकांचन, पुणे येथील उप कार्यकारी अभियंतावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | ऊरुळीकांचन पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३१ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | धम्मपाल हौसाजी पंडीत, वय ५० वर्ष, उप कार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय, उपविभाग, ऊरुळीकांचन, पुणे. (वर्ग-२) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | २,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,०००/- रुपये (दोन हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | ०९/०२/२०२४ |
| सापळा दिनांक | ०४/०३/२०२४ |

ठिकाण :- उप कार्यकारी अधिकारी महावितरण कार्यालय, उप विभाग ऊरुळीकांचन, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे रजिस्टर सरकारी ठेकेदार असून, खाजगी जमीन मालक यांनी तक्रारदार यांना त्यांचे सोरतापवाडी, ता. हवेली, जि. पुणे येथील त्यांचे जमिनीतील लाईट पोल दुसरीकडे शिफ्टींग करण्याचे काम दिले होते. सदर कामाची फाईल मंजुरीकरीता लोकसेवक धम्मपाल पंडीत यांचेकडे प्रलंबित होती. नमुद फाईल मंजुर करणेकरीता लोकसेवक धम्मपाल पंडीत यांनी तक्रारदार यांचेकडे २,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, दि. ०९/२/२०२४ रोजी लोकसेवक धम्मपाल पंडीत यांनी तक्रारदार यांचेकडे लाईट पोल दुसरीकडे शिफ्टींग करण्यास मंजुरी देणेसाठी २,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन, आज दि. ०४/०३/२०२४ रोजी लोकसेवक धम्मपाल पंडीत यानी तक्रारदार यांचेकडून रक्कम रुपये २,०००/- (दोन हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध ऊरुळी कांचन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक रुपेश जाधव तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.